**बृहन्मुंबई महानगरपालिका**

घन कचरा व्यवस्थापन, पी/दक्षिण

सहाय्यक अभियंता(घकव्य )पी/दक्षिण यांचे कार्यालय.पी/दक्षिण विभाग कार्यालय.सी.टी.एस.क्र. ७४६,व्हिलेज पहाडी स्वामी विवेकानंद मार्ग.गोरेगाव(पश्चिम),मुंबई

---

सहा.अभि.(घकव्य)/ ४६८२/पी/दक्षिण दिनांक ०२/०९/२०२६

# <u>सुचना</u>

**विषय:-** पी/दक्षिण विभागात गणेशोत्सव- 2026 या काळात विसर्जन स्थळांवर निर्माण होणा-या निर्मल्यापासून निर्मल्य खत निर्मिती हा उपक्रम राबविण्याकरीता अशासकीय संस्थेची नेमणूक करण्याबाबत.

**पी/दक्षिण विभागाच्या प्रशासकीय हद्दीतील संस्थांना** याद्वारे सुचित करण्यात येते की, पी/दक्षिण विभागात गणेशोत्सव- 2026 या काळात विसर्जन स्थळांवर निर्माण होणा-या निर्माल्यापासून निर्माल्य खत निर्मिती हा उपक्रम राबविण्याकरीता अशासकीय संस्थेची सोडत पद्धतीने निवड करण्याचे प्रस्ताविलेले आहे.

अर्ज तसेच योजनेच्या अटी व शर्ती सहाय्यक अभियंता (घकव्य) पी/दक्षिण विभाग ह्यांच्या कार्यालयात निशुल्क उपलब्ध असून त्या **दि.02 सप्टेंबर**,**2026 ते दि.05 सप्टेंबर**,**2026** पर्यंत **सकाळी 11:00 ते दुपारी 04:00** वाजेपर्यंत मिळतील. अर्ज भरताना सोबत छाननी शुल्क रु. 400/- अधिक 18% जीएसटी इतके रोखीने नागरीक सुविधा केंद्रामध्ये भरलेल्याची पावती जोडणे अनिवार्य आहे. इच्छूक अशासकीय संस्थांनी आपले अर्ज सहाय्यक अभियंता (घकव्य) पी/दक्षिण यांच्या कार्यालयात **दि.07 सप्टेंबर**,**2026 दुपारी 12:00 वाजेपर्यंत** सादर करावेत. नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधीनंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाही.

सदर कामाच्या अटी व शर्ती नुसार पात्र ठरलेल्या संस्थांपैकी **01 अशासकीय संस्थांची दि.08 सप्टेंबर**,**2026 रोजी दुपारी 12:00 वाजता सोडत पद्धतीने** सदर कामाकरीता निवड करुन कामाची संधी देण्यात येईल. सदर सोडतीस पात्र संस्थांच्या पदाधिका-यांस उपस्थित रहाणे बंधनकारक असेल. सोडती बाबत सर्व अधिकार महानगरपालिका राखून ठेवत आहे.

**(टिप: 1) 01 कामाकरीता 01 संस्था अर्ज करेल.**
**2)सदर सोडतीस संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित नसल्यास संस्था सहभागी करता येणार नाही.)**

**सही/-**
**सहा.अभि(घकव्य)पी/दक्षिण**